# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली सुरु आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह, या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित आहेत.

बैठकीपूर्वी जारी केलेल्या निवेदनात गृह मंत्रालयानं, २०२६ पर्यंत नक्षलवादाचं उच्चाटन करण्यासाठी कटीबद्ध असल्याचं म्हटलं आहे. नक्षल प्रभावित राज्यांना केंद्र सरकार सर्व प्रकारची मदत करत असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

****

मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू भारताच्या दौऱ्यावर आले असून, आज त्यांचं नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू आणि पंतप्रधान मोदी यांच्या आज द्विपक्षीय चर्चा झाली. परस्पर हिताच्या क्षेत्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमध्ये विचारांची देवाणघेवाण झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान मोईजू यांच्या या दौऱ्यादरम्यान उभय देशांमध्ये अनेक सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून नवी दिल्लीत सुरू झाली. यावेळीही बँकेच्या पतधोरणात बदल होण्याची शक्यता नसल्याचं तज्ज्ञांचं मत असून, अन्नधान्याची महागाई नियंत्रणात ठेवून आर्थिक विकास सुरू ठेवणं हा पतधोरण समितीसाठी चर्चेचा प्रमुख मुद्दा असेल, असं

याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. परवा बुधवारी रिझर्व्ह बँक पतधोरण जाहिर करेल.

****

जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी उद्या होणार आहे. मतमोजणी सुरळीत पार पडण्यासाठी सर्व केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये होणारी ही पहिलीच निवडणूक आहे. हरियाणामध्ये, वेगवेगळ्या जिल्ह्यांतल्या स्ट्राँग रूममध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत मतदान यंत्रं ठेवली आहेत.

****

अंमली पदार्थ विरोधी पथक आणि गुजरात दहशतवाद विरोधी पथक यांच्या संयुक्त पथकानं मध्य प्रदेश राज्यात भोपाळमधून अठराशे कोटीं रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. भोपाळजवळच्या बागरोडा गावातल्या एका कारखान्यातून हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.

****

देशातल्या प्रत्येक न्यायालयानं न्याय सर्वासाठी हे ब्रीद घेऊन कार्य करणं अभिप्रेत आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं आहे. अकोला जिल्ह्यातल्या मूर्तिजापूर इथल्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या कोनशिलेचं अनावरण, गवई यांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. न्यायदानाच्या माध्यमातून, आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणं राज्यघटनेला अभिप्रेत आहे. आपल्याला राज्यघटनेने दिलेले हक्क आणि अधिकार, हीच भारतीयांची प्रेरणा असल्याचं, गवई यावेळी म्हणाले.

****

मुंबईतल्या नायगाव बीडीडी चाळीचं नामांतर 'बीडीडी चाळ नायगाव – डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल' असं करण्यात आलं आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात 'शरद पवार नगर' असं या नायगावच्या बीडीडी चाळींना नाव देण्यात आलं होतं. मात्र, नायगावची बीडीडी चाळ ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली असून, या चाळीमध्ये बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या प्रमाणावर राहतात. त्यांची आणि स्थानिक

लोकप्रतिनिधींची मागणी मान्य करत हे नामकरण करण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला.

****

प्रसिद्ध उद्योजक रतन टाटा यांचा रक्तदाब खालावल्यानं, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मुंबईत ब्रीच कॅण्डी रुग्णालयात टाटा यांच्यावर उपचार सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, आपण नियमित तपासणीसाठी रुग्णालयात आलो असून, काळजीचं काहीही कारण नसल्याचं, टाटा यांनी एका ट्विट संदेशात म्हटलं आहे. आपल्या प्रकृतीबाबत काहीही अफवा पसरवू नये, असं आवाहनही टाटा यांनी केलं आहे.

****

राज्यात आज दोन वेगवेगळ्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. वाशिम जिल्ह्यात पुसद – वाशिम मार्गावर मारवाडी फाट्याजवळ एक चारचाकी झाडाला आदळून झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. कारमधले सर्वजण अहमदनगर जिल्ह्यातले रहिवासी असून, ते माहूर इथून देवीचं दर्शन घेऊन परत जात असताना आज सकाळी हा अपघात झाला. सर्व जखमींना वाशीम शहरातल्या विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे.

****

सोलापूर जिल्ह्यात सांगोला तालुक्यात भरधाव कारने मालट्रकला पाठीमागून जोरदार धडक देऊन झालेल्या भीषण अपघातात दोघेजण जागीच ठार तर तिघेजण गंभीर जखमी झाले. कारमधले हे सर्वजण कोल्हापूरचे असून, तुळजापूरहून दर्शन घेऊन परत जाताना आज पहाटे हा अपघात झाला. जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****